**प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,**
**कर्जत—४१०२०१, जि. रायगड**

जा.क्र.प्राकृसकें/वरोशा/ 1328 /२०२३. दि. ०३/०७/२०२३

3 JUL 2023

**प्रति,**

मा. संचालक विस्तार शिक्षण,
डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापिठ,
दापोली, जि. रायगड.

विषय : विद्यापिठ संकेतस्थळावर जाहिर प्रसिध्दी करणेबाबत...

**महोदय,**

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथे वनस्पती रोगशास्त्र विभागात भात पिकाचे उत्पादनोमुखी सर्व्हेक्षण या संशोधन उपक्रमाकरीता वाहनाची आवश्यकता आहे. यासाठी खाजगी वाहन **भाडेतत्वावर पुरविण्याचे** दरपत्रक मागविण्यात येत आहे. तरी याबाबतच्या दरपत्रकास विद्यापिठ संकेतस्थळावर योग्य ती जाहिर प्रसिध्द मिळणेकरीता सविनय सादर.

आपला विश्वासू,

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड.

O/C

डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत.
जि. रायगड. ४१० २०१

डॉ एस. बी. भगत
सहयोगी संशोधन संचालक,

फॅक्स/फोन (कार्यालय): ०२१४८–२२२०३५
ई मेल: adrkarjat@rediffmail.com

जा.क्र. ससंसं/प्राकृसंके/वरोवि/ 1328 /२०२३

दिनांक: 3 JUL 2023

प्रति,
........P.T.O........
................................
................................

विषय: वाहन भाडेतत्वावर पुरविण्याचे दरपत्रक......

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत जि. रायगड येथे वनस्पती रोगशास्त्र विभागासाठी सन २०२३–२४ या आर्थिक वर्षामध्ये भात पिकाचे उत्पादनोमुखी सर्व्हेक्षण या संशोधन उपक्रमाकरीता वाहनाची आवश्यकता आहे. यासाठी खाजगी वाहन इनोव्हा, झायलो, स्कॉर्पिओ, इर्टिगा किंवा तव्हेरा यापैकी एक गाडी (AC/ Non AC) भाडेतत्वावर घ्यावयाचे आहे. तरी सदर वाहनांचे प्रति किलोमीटर, संपूर्ण दिवसाचे दर (इंधन व इंधन विरहीत) मुक्कामाचे दर (AC/Non AC) यांचे दरपत्रक सोबत दिलेल्या अटी व शर्तीना अधिन राहून या कार्यालयास पोस्टाने/हातबटवडयाने दिनांक १७/०७/२०२३ पर्यंत सादर करावे. **सदर दरपत्रकावर वनस्पती रोगशास्त्र असे नमूद करावे.**

| अ.क्र. | गाडीचा प्रकार | इंधनाचा प्रकार | प्रति दिवस | | दर प्रति किमी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | इंधन सहित | इंधन विरहीत | इंधन सहित | इंधन विरहीत |
| १ | इनोव्हा/ झायलो/ स्कॉर्पिओ /तव्हेरा /इर्टिगा (AC/Non AC) | | | | | |

**त्यासंबंधीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे.**

१. प्रत्येक वाहनासाठी तपशिलवार माहिती असलेले स्वतंत्र लॉगबुक ठेवणे.
२. वाहन ताब्यात घेतल्यापासून ते परत केल्यापर्यंतचा कालावधी भाडे अदायगीसाठी धरावा.
३. १२ तासापर्यंतचा कालावधी अर्धा दिवस तर १२ तासापेक्षा जास्त कालावधी झाल्यास पुर्ण दिवस म्हणजेच २४ तासाचे भाडे अदा करावे.
४. इंधन शासकिय कार्यालयातर्फे कोष्टकानुसार पुरविण्यात येईल किंवा त्याचा खर्च कि. मी. प्रमाणे (कोष्टकाप्रमाणे) सरासरी काढुन वेगळा देण्यात येईल. त्यासाठी झालेली धाव कि. मी. मध्ये प्रत्यक्ष तपासली जाईल.
५. वाहन शक्यतो ५ वर्षापेक्षा जुने नसावे.
६. वाहनाचा मेटेंनन्स खर्च, इतर खर्च तसेच अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी वाहन मालकाचीच राहील.
७. वाहनाचे / चालकाचे सर्व कागद पत्र जसे नोंदणी, कर, विमा, योग्यता प्रमाणपत्र, परवाना, पीयुसी, चालकाची अनुज्ञप्ती, बॅच इ. वैध असणे आवश्यक आहे. **पिवळया पाटीच्या वाहनधारकांची दरपत्रके स्विकारण्यात येतील.**
८. टोल व पार्किग चार्जेस वाहन वापरणाऱ्या कार्यालयाने भरावयाचे आहे.
९. टी. डी. एस किंवा कायदेशिर वजाती आवश्यक असल्यास त्या करून त्याचे प्रमाणपत्र संबधितास द्यावे.
१०. मुक्कामाचा वाहन चालकाचा खर्च वेगळा दिला जाणार नाही.
११. वाहन चालकाचा वाहन चालविण्याचा वेगळा भत्ता दिला जाणार नाही. तसेच वाहन चालकाचा जेवणाचा खर्च वाहन मालकाने करावयाचा आहे.
१२. वाहनामध्ये ५ ते ६ व्यक्तिंना प्रशस्तपणे बसता यावे.
१३. वाहन आवश्यकतेनुसार उपलब्ध व्हावे.
१४. दरपत्रकात नमुद केलेले दर हे ३१ मार्च २०२४ पर्यत लागू राहतील.
१५. आपले दरपत्रक या कार्यालयाकडून मंजुर झाल्यास वरील शासकिय नियमाप्रमाणे अटी व शर्ती रू. १०० च्या बॉण्ड पेपर वर करारनामा लिहुन या कार्यालयास सादर करावा लागेल.

सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
O/C कर्जत, जि. रायगड.